महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.२-ब/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# सुधारपत्र क्र. ४१ दिनांक १३ / ०२ / २०१९

**(म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम - २००५)**

**विषय :** महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना बाल संगोपन रजा मंजूर करण्याबाबत.

.....

महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना सुधारपत्र क्र. ३९ दि. २९/०९/२०१८ अन्वये यापूर्वीच बाल संगोपन रजा मंजूर करण्यात आलेली आहे. सदर रजा म.रा.वि.वि.कं.मर्या. कर्मचारी सेवाविनियम - २००५ मधील सेवाविनियम क्र. ५३ (ज) मध्ये अंतर्भूत करण्यात आलेली आहे.

२. आता महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०१७/प्र.क्र.२५/सेवा-६. दि. १५/१२/२०१८ अन्वये ज्याची पत्नी असाध्य आजाराने अंथरूणास खिळलेली आहे अशा पुरूष कर्मचाऱ्यास त्याच्या मुलाच्या बालसंगोपनाच्या प्रयोजनासाठी बाल संगोपन रजा अनुज्ञेय करण्यासाठी, पत्नीच्या आजाराबद्दल, तसेच आजाराबद्दलच्या निकषाबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या अनुषंगाने मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (वाणिज्य) आणि संचालक (प्रकल्प) यांचेशी विचारविनिमय करून सदरच्या तरतुदी म.रा.वि.वि.कं.मर्या. कर्मचारी सेवाविनियम - २००५ मधील सेवाविनियम क्र. ५३ (ज) मध्ये खालीलप्रमाणे अंतर्भूत करण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे.

**सेवाविनियम क्र. ५३(ज)**

(अठरा) कंपनीतील ज्या कर्मचाऱ्याची पत्नी विविध आजारपणाच्या कारणास्तव जेवढया कालावधीसाठी अंथरूणास खिळून राहिली आहे (Bed Ridden), अथवा त्यांची पत्नी मनोरूग्ण असल्यामुळे, जेवढया कालावधीसाठी बाल संगोपन करण्यास असमर्थ होत आहे (Incapacitated), तेवढया कालावधीचे वैद्यकीय अधीक्षक (जे.जे.रुग्णालय) / जिल्हा शल्य चिकित्सक (शहरी भागांसाठी)/ जिल्हा आरोग्य अधिकारी (ग्रामीण भागासाठी) यांचेकडून संबंधित कर्मचाऱ्यांने वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, संबंधित पुरूष कर्मचाऱ्यांस, तेवढया कालावधीची बाल संगोपन रजा अनुज्ञेय राहील.

(एकोणीस) संबंधीत कर्मचाऱ्याची पत्नी किती कालावधीसाठी आंतररुग्ण आहे (In-patient) आणि अंथरूणास खिळलेली आहे अथवा बालसंगोपन करण्यास असमर्थ आहे, हे पाहून प्रकरणपरत्वे तेवढया कालावधीची (१८० दिवसाच्या कमाल मर्यादेत), बाल संगोपन रजा संबंधित पुरूष कर्मचाऱ्यांस अनुज्ञेय राहील. तसेच बाल संगोपनासाठी पतीला रजा मंजूर झाल्यानंतर रजा कालावधीत पत्नीचा मृत्यु झाल्यास, पतीला उर्वरित कालावधीची बाल संगोपन रजा १८० दिवसांच्या कमाल मर्यादेत अनुज्ञेय राहील.

३. अर्जित रजा मंजूर करण्याकरिता म.रा.वि.वि.कं.मर्या., सेवाविनियम २००५ शी संलग्नित नववी अनुसूचीमध्ये विहित करण्यात आलेले सक्षम अधिकारी हे बाल संगोपन रजा मंजूर करण्यास सक्षम अधिकारी राहतील.

४. सदरची तरतूद या संदर्भात पारित करण्यात आलेल्या आदेशाच्या तारखेपासून लागू करण्यात यावी.

५. सदर सुधारपत्र कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(कमांडर शिवाजी इंदलकर)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)